आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

# बढती मधील आरक्षण प्रकरण;

## सर्वोच्य न्यायालयाने चुकीचा अर्थ काढल्यामुळे, करोडो कर्मचाऱ्यानवर अन्याय

भारतीय संविधाना नुसार बढती मधील आरक्षणाची स्पष्ट पणे तरतूद अनुसूचित जाती आणि जमाती साठी घटनेचे कलम १६(४अ) व १६(४ब) नुसार केलेली आहे, असे असतांना सर्वोच्य न्यायालयाच्या एम.नागराजन प्रकरणी पाच न्यायधीशांच्या संविधानिक खंडपीठाने कशाच्या आधारावर बढती मधील आरक्षण, बंद करण्याचे आदेश दिले ? हा एक संशोधनाचा विषय बनला आहे. याच ठिकाणी सर्वोच्य न्यायालयाने चुकीचा निष्कर्ष काढल्यामुळे करोडो कर्मचारी अधिकाऱ्याचे बढती मधील आरक्षण रखडले आहे, आणि त्याचा परिणाम आरक्षणा मधील बॅकलॉग भरण्यास राज्य सरकारांना अडचणी निर्माण झाल्या आहे. पर्यायाने सविधांनाने बहाल केलेले, समान संधी आणि सामाजिक न्याय, या तत्वापासून आपण दूर जात आहोत, या ठिकाणी आनखी एक गोष्ट आवर्जून नमूद करावीसी वाटते, ती अशी की सर्वोच्य न्यायालयाने चुकीचा अर्थ काढून या प्रकरणी निर्णय दिला तोच धागा पकडून विविध उच्च न्यायालय बढती मधील आरक्षणाला स्थगिती देत आहेत.

सर्वोच्य न्यायालयाच्या एम.नागराजन प्रकरणी न्यायालयाने जो निष्कर्ष काढला आहे तो पुढील प्रमाणे:-

**एम.नागराजन प्रकरणी सर्वोच्य न्यायालयाने आपले निष्कर्ष काढतांना, काय म्हटले आहे ते बघणे आवश्यक आहे. निष्कर्षात म्हटले आहे की, "ज्या संदर्भीय घटना दुरुस्तीद्वारा घटनेमध्ये कलम १६(४अ) व १६(४ब) घातले गेले आहेत, <u>ती घटना दुरुस्ती घटनेच्या कलम १६ (४) मधूनच उत्पन्न झाली आहे.</u> घटनेच्या कलम ३३५ या अंतर्गत राज्य शासनाची कार्यक्षमता ध्यानात घेऊन राज्य शासनाला ज्या घटकामुळे आरक्षणाची तरतूद करता येते, ते घटक किंवा कारणे या घटना दुरुस्ती मुळे, कायम राहते. कारणे किंवा घटक म्हणजे मागासलेपणा व पुरेसे प्रतिनिधित्व नसणे. ज्या संदर्भित घटना दुरुस्तीद्वारा घटनेत सदर १६(४ अ) व १६( ब) घातले गेलेत आहेत, ती घटना दुरुस्ती, घटनेच्या कलम १६(४) ची संरचना बदलत नाही. सदर संदर्भित घटना दुरुस्त्या फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती पुरत्याच मर्यादित आहेत. त्यामुळे घटनेची कोणतेही प्रावधाने नाश पावत नाहीत. किंवा लोप पावत नाहीत.**



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, वाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458. 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाळ रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१ . टेली - 07232-256333, 256010

Scanned by CamScanner

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९०

# संविधानाचे कलम १६(४) सी बढती प्रकरणी संबंध जोडणे चुकीचे

वर उल्लेखित १६(४) हे कलम खऱ्या अर्थाने राज्यासाठी आणि इतर मागासवर्गीयासाठी म्हणजेच, एस.सी, एस.टी व्यतिरिक्त मागास घटकासाठी आहे. (भटके विमुक्त, परंपरागत व्यवसायी ) आणि त्या मुळे ती घटना दुरुस्ती घटनेच्या १६(४) मधून उत्पन्न झालेली आहे, असे म्हणणे सपशेल चुकीचे आहे.या कलमाचा आणि एस.सी, एस.टी या घटकाचा सुत्रामही संबंध नाही, या कलमा विषयी संविधान सभेमध्ये १९४८ साली चर्चा चालू असताना, श्री टी. रामकृष्णचारी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विचारले होते की, डॉ भीमरावजी मागासवर्गीय म्हणजे काय ? त्यावेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी असे स्पष्ट केले होते की, "एखाद्या राज्याच्या मते, त्यांना वाटत असेल की, एखादा नागरिकांचा मागासवर्ग हा सुद्धा मागासलेला आहे, आणि त्याला शासन व्यवस्थेमध्ये (विशेषतः नोकरी आणि शिक्षणामध्ये) योग्य प्रतिनिधित्व मिळालेले नाही, तर त्यांच्यासाठी काही पदे राखीव ठेवण्यात काही हरकत नसावी." त्याच वेळेस डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी हेही स्पष्ट केले होते की, "या कलमाअंतर्गत मागासवर्ग ठरवण्याची राज्य शासनाला संपूर्ण अधिकार दिलेला आहे."याचाच अर्थ असा कि जो समाज घटक राज्याअतर्गत मागास असेल,तो समाज घटक, केंद्रीय सूचीमध्ये मागास असेलच असे नाही.

वरील संविधान सभेमधील चर्चा लक्षात घेता, हे स्पष्ट आहे की, संविधानाच्या कलम १६(४) चा आणि अनुसूचित जाती, जमातीचा काहीही संबंध नाही, विधी व न्यायदानाच्या बाबतीत, एक गोष्ट अशी मानली जाते ती अशी की, संविधानाच्या कलमाचा अर्थ लावायचा असेल तर, त्या वेळेस त्या कलमावर झालेली चर्चा , आणि भाषणे, बघितली जातात, व त्यानुसार सर्वोच्च न्यायालये आणि उच्च न्यायालये अर्थ काढीत असतात.त्याच प्रमाणे एखाद्या कायद्याच्या बाबतीत अर्थ काढण्याच्या संदर्भात वाद निर्माण झाला असेल तर, न्यायालय तो संबंधित कायदा मंजूर करताना,( विधिमंडळ किवा संसदेत) त्या कायद्याच्या बिलाला जोडण्यात आलेले उद्देश आणि कारणे तपासली जातात. त्याच प्रमाणे या प्रकरणात सुद्धा, आरक्षणाचा उद्देश स्पष्ट आहे की, संबंधित पदाचा बॅकलॉग भरण्यासाठी , आणि आरक्षणाच्या तरतुदींच्या उद्देशाची पूर्तता करण्यासाठी आणि आरक्षणाचे तत्व, समान संधी, आणि सामाजिक न्याय या साठी आरक्षण दिले गेले आहे. आणि ते सविधानात्मक आहे. त्यामुळे कायद्याचे किस काढण्यामध्ये, आणि अर्थाचे अनर्थ करण्यामध्ये न्यायालयांनी वेळ घालवू नये. आणि मागासवर्गीयानवर अन्याय करू नये. असे प्रामाणिक पणे वाटते.

दोन्ही बाजूच्या विद्वान वकिलाला आणि पर्यायाने न्यायालयाला आमची नम्र विनंती आहे की, आम्ही न्यायालयात उभे राहून, उलट तपासणी घेऊ शकत नाही,परंतु आम्ही सर्व तज्ञ मंडळीला न्यायदानासाठी विनंती जरूर करू शकतो.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

Scanned by CamScanner

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
**आमदार (MLC)**
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०३१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

**कृपया खालील बाबींचा विद्वान,तज्ञ वकिलांनी नीट अभ्यास करावा.**

(१) संविधानाचे कलम १६(४)हे कोणासाठी आहे ? जर हे कलम इतर मागासवर्गीयासाठी असेल तर, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती बरोबर या कलमाचे सांगड घालणे बरोबर आहे काय ?

(२) मागासलेपणा सिद्ध करण्यासाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांना संविधानाचे कलम ३४१ आणि कलम ३४२ नुसार संबंधित राज्यांनी मागासलेपनाची म्हणजेच, अनुसूचित जाती, जमाती या संदर्भात असलेल्या सर्व कसोट्या पूर्ण केल्यानंतर आणि संबंधित राज्याच्या मा.राज्यपालांच्या शिफारशी नुसार आणि , मा.राष्ट्रपतींच्या मान्यतेने त्यांचा अनुसूची मध्ये समावेश झालेला आहे **( they are deemed to be backward)**

(३) वरील बाब म्हणजेच मागासलेपणा सिद्ध करण्याची आवश्यकता नाही, या करिता पुढील उदाहरण ध्यानात घ्यावे, ते असे जर दहा वर्षां पूर्वी एस.सी च्या जागेवर लिपिक या पदावर लागलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला, आज आपण त्यांच्या रोष्टर प्रमाणे वरिष्ठ लिपिक या पदावर, आरक्षण देत असेल तर, त्याला आपण तुम्ही मागासवर्ग आहात काय ? असे कसे विचारू शकतो ? किंवा असे राज्य सरकारला विचारणे हे बरोबर आहे काय ? न्यायालयाच्या न्यायदानाच्या पारड्यामध्ये , हे प्रकरण कसे काय तोलता येईल ? याचा पुनश्च एम.नागराजन प्रकरणी विचार व्हावा.

(४) राज्य शासनाच्या अखत्यारीतील आस्थापना मध्ये जर, बॅकलॉग असेल तर, तो भरून काढण्यासाठी न्यायालयांनी उपाययोजना किंवा स्कीम सुचवावी, जेणे करून संविधानाच्या, सामाजिक न्याय या तत्वाला सुसंगत असा कायदा बनवता येईल.आणि संविधानाने बहाल केलेले मुलभूत हक्क आबाधित राखता येईल.

वरील प्रमाणे हे माझे मत आहे, आणि मी ठाम आहे की सर्वोच्च न्यायालय याच ठिकाणी चुकले आहे, असे वाटते. आता दोन्ही बाजूच्या तज्ञ वकिलांना, माझी विनंती आहे की, हा तिढा आपण सोडवावा, अन्यथा सरकारने घटना दुरुस्ती करावी, हाच एक मार्ग दिसतो.

**---- हरिभाऊ राठोड**
**विधानपरिषद सदस्य,**



Scanned by CamScanner